॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT

Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215246

website: srtmun.ac.in
E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२६–२७/121 परिपत्रक दिनांक : २१/०९/२०२६ 22

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. संबंधित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: सेवा संकल्प अभियान राबविणे बाबत

संदर्भ :१) डॉ. शैलेंद्र देवळाणकर,प्र.संचालक,उच्च शिक्षण,म.रा. पुणे यांचे क्रं.युएनआय/विशि–१/टे.क्र.४०/ई ३१२००९२४दि.स्वाक्षरीप्रमाणे

२) मा.राजेश आग्रवाल,मुख्य सचिव,शा.नि.क्रं.सेअंअ–२०२६/प्र.क्र. ९५/रवका–२/मुंबई दि.०९ सप्टेंबर २०२६

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, दिनांक १७/०९/२०२६ ते दिं.१७.१०.२०२६ या कालावधीत राज्य शासनामार्फत सेवा संकल्प अभियान राबविण्याबाबत सोबत जोडलेल्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये पुढीलप्रमाणे विद्यापीठ व महाविद्यालयांनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

१) **Innovation Challenge** चे आयोजन राज्य इनोव्हेशन सोसायटीच्या समन्वयाने होणार असून त्या सहभाग घ्यावा. त्या संदर्भात कौ.रो.उ.व ना. विभागाकडून नोडल विभाग म्हणून निर्गमित होणा–या सूचनांनुसार कार्यवाही करावी.

२) महाविद्यालय स्तरावर **Career Counselling** आयोजित करावे.

३) महाविद्यालय स्तरावर **Cyber Security awarness** मोहीम राबविण्यात यावी.

४) महाविद्यालय स्तरावर रांगोळी स्पर्धा आयोजित कराव्यात.

उपरोक्त प्रमाणे सदरील आयोजित उपक्रम हे संदर्भीय पत्र क्रं ०२ अन्वये मा.राजेश अग्रवाल,मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या पत्राचे पूर्ण अवलोकन करुन कार्यक्रम घेणे आवश्यक आहे. सदरील कार्यक्रमाचे अहवाल विद्यापीठाच्या **nss@srtmun.ac.in** तसेच प्र.संचालक, उच्च शिक्षण,म.रा.पुणे यांच्या **vishi.dhepune@nic.in** या इमेलवर पाठविण्यात यावे, ही विनंती.

डॉ.मारोती गायकवाड
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
412 ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी,शिवाजीनगर, पुणे 411 016
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.020/26122119

क्रमांक-युएनआय/विशि-१/टे.क्र.४०/ ई-**३१२०९२४** दि. स्वाक्षरीप्रमाणे.

प्रति,
१.कुलसचिव,
सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे.
२.सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

विषय- सेवा संकल्प अभियान राबविण्याबाबत. -

संदर्भ- शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२६ / ई-१८५०५४७ दि.१६.०९.२०२६.

उपरोक्त विषयास व संदर्भीय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की,दि.१७/०९/२०२६ ते दि.१७/१०/२०२६ या कालावधीत राज्य शासनामार्फत सेवा संकल्प अभियान राबविण्याबाबत संदर्भाधीन शासन पत्रासोबत जोडलेल्या शासननिर्णयान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये पुढील कार्यक्रमांचे आयोजन राज्य विद्यापीठे व त्याच्याशी संलग्नीत महाविद्यालये यांच्यामार्फत करण्यात यावे :-

(१) Innovation Challenge चे आयोजन राज्य इनोव्हेशन सोसायटीच्या समन्वयाने होणार आहे असून त्यात सहभाग घ्यावा. त्या संदर्भात कौ. रो. उ. व ना. विभागाकडून नोडल विभाग म्हणून निर्गमित होणाऱ्या सूचनांनुसार कार्यवाही करावी.

(२) विद्यापीठ / महाविद्यालय स्तरावर Career Counselling आयोजित करावे.

(३) विद्यापीठ / महाविद्यालय स्तरावर Cyber security awareness मोहीम राबविण्यात यावी.

(४) विद्यापीठ / महाविद्यालय स्तरावर रांगोळी स्पर्धा आयोजित कराव्यात.

तरी उपरोक्तप्रमाणे तातडीने आवश्यक ती कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.१७.१०.२०२६ नंतर संचालनालयास तात्काळ करण्यात यावा.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 17-09-2026 17:58:51

(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
प्र.संचालक,उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य,पुणे-१६

प्रत-
मा.अपर मुख्य सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई यांना माहितीस्तव.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४२१,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID : vishi5.hted-mh@mah.gov.in

---

क्र संकीर्ण २०२६ / **ई १८५०५४७** / वि शि ५ दिनांक :- १६/०९/२०२६

प्रति-

संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय,
पुणे.

**विषय - सेवा संकल्प अभियान राबविण्याबाबत.**

संदर्भ - सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सेसंअ-२०२६/ प्र.क्र. ९५/ रवका-२, दि. ०९/०९/२०२६ (प्रत सोबत)

महोदय,

दि १७/०९/२०२६ ते १७/१०/२०२६ या कालावधीत राज्य शासनामार्फत सेवा संकल्प अभियान राबविण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये पुढील कार्यक्रमांचे आयोजन राज्य विद्यापीठे व त्याच्याशी संलग्नीत महाविद्यालये यांच्यामार्फत करण्यात यावे :-

(१) Innovation Challenge चे आयोजन राज्य इनोव्हेशन सोसायटीच्या समन्वयाने होणार आहे असून त्यात सहभाग घ्यावा. त्या संदर्भात कौ. रो. उ. व ना. विभागाकडून नोडल विभाग म्हणून निर्गमित होणाऱ्या सूचनांनुसार कार्यवाही करावी.

(२) विद्यापीठ / महाविद्यालय स्तरावर Career Counselling आयोजित करावे.

(३) विद्यापीठ / महाविद्यालय स्तरावर Cyber security awareness मोहीम राबविण्यात यावी.

(४) विद्यापीठ / महाविद्यालय स्तरावर रांगोळी स्पर्धा आयोजित कराव्यात.

तरी सर्व सार्वजनिक विद्यापीठांना उपरोक्तप्रमाणे तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

आपला,

( प्रविण अकोलकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**सोबत** - वरीलप्रमाणे

प्रत -संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.

दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते दिनांक १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत राज्यात "सेवा संकल्प अभियान" राबविणे बाबत..

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग / प्र.ना.उ. व सु.
शासन निर्णय क्रमांक: सेसंअ-२०२६/प्र.क्र.९५/रवका-२
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: ९ सप्टेंबर, २०२६

प्रस्तावना :-

आपल्या देशाचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त व त्यांनी त्यांच्या कार्यकाळात "सेवा परमोधर्म" या उक्तीप्रमाणे सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहचविण्याचा अविरत प्रयत्न केला आहे. त्यांच्या सेवा कार्याचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने त्यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १७ सप्टेंबर, २०२६ ते दि. १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत राज्यात "सेवा संकल्प अभियान" राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार, शासनाने "सेवा संकल्प अभियान" राबविण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते दिनांक १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत राज्य शासनामार्फत **सेवा संकल्प अभियान** अंतर्गत खालील उपक्रम राबविण्यात यावेत.

१. सेवा सेतू अभियान :-

प्रत्येक तालुका स्तरावर सेवा सेतू अभियान अंतर्गत शिबीर आयोजित करण्यात यावेत. त्यामध्ये राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध योजनांचे थेट लाभ पात्रतेनुसार नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात यावेत. त्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत अर्ज प्रक्रिया पूर्ण करुन कॅम्प मध्येच लाभ उपलब्ध करुन देण्यात यावा.

महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ९ जुलै, २०२६ व दिनांक १८ फेब्रुवारी, २०२६ नुसार छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर तालुक्यामध्ये किमान एका ठिकाणी आयोजित करण्यात यावे.

सेवा सेतू अभियान कालावधीत वन हक्क दावे स्विकृत करुन ग्रामस्तरीय वन हक्क समिती, तालुकास्तरीय वन हक्क समिती व जिल्हास्तरीय वन हक्क समिती यांच्या बैठका आयोजित करुन नविन वन हक्काचे दावे तसेच, पूर्वीच्या दाव्यातील दुरुस्त्या करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांनी निश्चित करुन वन हक्क दावे मंजूर करणे व मंजूर वन हक्क दाव्यांनुसार अधिकार अभिलेख तयार करुन देण्याची कार्यवाही पूर्ण करावी. याबाबत, जिल्हानिहाय वेळापत्रक तयार करुन अभियान कालावधीत सर्व दावे निर्णयीत होतील याची दक्षता जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावी. अभियान संपल्यानंतर यासंदर्भातील संकलीत अहवाल महसूल विभागाकडे सादर करावा.

याशिवाय, सेवा सेतू अभियानांतर्गत तालुका स्तरावर शिबीर आयोजित करुन खालील सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत **महसूल विभागाने** कार्यवाही करावी.

| अ.क्र. | सेवा | अ.क्र. | सेवा |
|---|---|---|---|
| १. | प्रलंबित फेरफार नोंदीचा निपटारा करणे / जिवंत सातबारा मोहीम | १२. | बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत सिंचन विहिरी करिता अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करणे |
| २. | गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद वाटप करणे | १३. | दिव्यांग प्रमाणपत्र देणे |
| ३. | मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते उपलब्ध करणे | १४. | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे |
| ४. | पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिकांचे वितरण | १५. | आधार कार्ड देणे |
| ५. | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र देणे | १६. | जन्म मृत्यू नोंद घेणे व प्रमाणपत्र देणे |
| ६. | पात्र लाभार्थ्यांना वन हक्क दावे मंजूर करणे | १७. | शिकाऊ वाहन चालक परवाना |
| ७. | मालमत्ता हस्तांतरण नोंद घेणे | १८. | महिला बचत गट नोंदणी |
| ८. | नव्याने नळ जोडणी देणे | १९. | ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र |
| ९. | मालमत्ता कराची आकारणी करणे व मागणी पत्र देणे | २०. | महिला शेतकरी यांना प्रमाणपत्र वाटप करणे |
| १०. | प्रलंवित घरगुती विद्युत जोडणीस मंजुरी देणे | २१. | ७/१२ व ८ अ च्या नोंदी अद्ययावत करणे |
| ११. | मालमत्ता हस्तांतरणानंतर विद्युत जोडणीमध्ये नवीन मालमत्ताधारकाचे नाव नोंदविणे | २२ | जमिनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार जमिनीच्या मोजणीशी जोडणे |

२. **Innovation Challenge चे आयोजन:-**

राज्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यवसायिक व कॉर्पोरेट इनोव्हेटर्स व ग्रामीण भागातील नविन समाधाने (Solutions) विकसित करणाऱ्या लोकांना जोडण्यासाठी राज्यस्तरीय इनोव्हेशन चॅलेंज आयोजित करण्यात यावे. त्यामध्ये शैक्षणिक संस्था, स्टार्टअप नेटवर्क, इन्क्युबेशन सेंटर आणि खाजगी कंपन्या यांना सहभागी करुन घेण्यात यावे. सदर उपक्रमामध्ये निवडलेल्या सर्वोत्कृष्ट इनोव्हेटर्सना आमंत्रित तज्ञांसमोर सादरीकरण करण्यासाठी आमंत्रित करावे. त्यामधून राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट इनोव्हेटर्सची निवड केली जाईल. सदर कार्यक्रमाचे **कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, उद्योग विभाग व इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग** हे समन्वयाने आयोजन करतील. यामध्ये सहभागी होणाऱ्या इनोव्हेटर्सना योग्य तो डिजीटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करुन देण्यात यावा. यासाठी **कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग** हा नोडल विभाग म्हणून काम करेल.

३. **सेवा माझे योगदान :-**

प्रत्येक गावात / वार्डात सेवा योगदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. यामध्ये युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक यांचा सहभाग घेण्यात यावा. शिक्षण, कला, साहित्य, क्रीडा व समाज सेवा क्षेत्रातील प्रसिध्द व्यक्तिंना सहभागी करुन घ्यावे. यामध्ये, विशेषत: स्वच्छता मोहिम राबविण्यात येवून राज्यातील समुद्रकिनारे/ नदी घाटांची/बारवांची स्वच्छता करण्यात यावी. तसेच, भविष्यात नियमित स्वच्छता करण्यासाठी स्थानिक समिती गठीत करण्यात यावी. स्वच्छतेनंतर सदर ठिकाणी जाहीर कार्यक्रमाचे आयोजन करुन सामूहिक संकल्प घेण्यात यावा. सदर कामाचे व्हिडीओ रेकॉर्डीग करण्यात यावे.

सेवा योगदानासाठी खालीलपैकी एका किंवा अनेक सेवेची स्थानिक गरजेनुसार निवड करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १. रक्तदान शिबिर | २. अनाथालय / वृद्धाश्रम भेट |
| ३. वृक्षारोपण अभियान | ४. स्वच्छता ही सेवा |
| ५. आरोग्य तपासणी शिबिर | ६. एक गाव दत्तक घ्या - सेवा कार्य |
| ७. योग आणि ध्यान सत्र | ८. प्लास्टिक-मुक्ती जागरूकता |
| ९. महिलांचे आरोग्य आणि स्वच्छता | १०.वंचित मुलांसाठी शिक्षण सहकार्य |
| ११.करिअर कौन्सिलिंग सत्र | १२.ज्येष्ठ नागरिकांसाठी डिजिटल साक्षरता |

| | |
|---|---|
| १३.अवयवदान संकल्प अभियान | १४.व्यसनमुक्त भारत जागरूकता |
| १५.पोषण आणि ॲनिमिया जागरूकता | १६.रस्ते सुरक्षा जागरूकता |
| १७.जलसंधारण आणि जलस्रोत स्वच्छता | १८. कचरा वर्गीकरण आणि कंपोस्टिंग |
| १९.सायबर सुरक्षा जागरूकता | २०.फिट इंडिया खेळ सत्र |
| २१.वीर गाथा आणि सैनिकांचा सन्मान | २२.दिव्यांगजन सहयोग उपक्रम |
| २३.मतदार जागरूकता आणि नोंदणी | २४.व्होकल फॉर लोकल सहकार्य |
| २५.सरकारी योजनांची जागरूकता. | २६.विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी सर्व प्रमाणपत्रे |

ग्रामीण भागात सदर कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी **गट विकास अधिकारी** हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील. तसेच, शहरी भागात **मुख्याधिकारी / वार्ड अधिकारी** हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील. यासंदर्भातील संकलीत अहवाल **ग्राम विकास विभाग व नगर विकास विभाग** तयार करतील.

४. **विकसित भारत संकल्प यात्रा :-**

राज्यातील अत्यंत महत्त्वाचे व परिवर्तनकारी प्रकल्प व क्षेत्र यांची यादी तयार करण्यात यावी. सदर महत्त्वाच्या व परिवर्तनकारी प्रकल्पांमुळे लोकांच्या जीवनमानात, सुरक्षेत, अर्थव्यवस्थेत, पायाभूत सुविधांमध्ये व संधींमध्ये झालेल्या बदलांची माहिती प्रकल्पनिहाय संकलित करण्यात यावी. सदर संकलन राज्याच्या विविध विभागांनी तयार करुन **माहिती व जनसंपर्क विभागाकडे** सादर करावी. माहिती व जनसंपर्क विभागाने सदर प्रकल्पाबाबत व्यापक प्रसिध्दी करावी.

५. **सेवा ज्योत यात्रा :-**

विकसित भारत-२०४७ ची सेवा ज्योत यात्रा प्रत्येक गावात काढण्यात यावी. शहरी भागात बाइक रॅली आयोजित करण्यात यावी. गावातील व शहरातील प्रमुख ठिकाणी कार्यक्रम आयोजित करुन विकसित भारत २०४७ व शासनाच्या विविध कल्याणकारी योजना याबाबतची माहिती देण्यात यावी. कार्यक्रमाच्या शेवटी विकसित भारत २०४७ चा संकल्प घेण्यात यावा. सदर कार्यक्रमासाठी जिल्हा स्तरावर संबंधित **जिल्ह्याचे पालकमंत्री / जिल्हाधिकारी** यांचे उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

६. चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा :-

शासकीय व खाजगी शाळांमध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या “विकसित भारत” संकल्पनेवर आधारीत चित्रकला स्पर्धा आयोजित करुन शाळेमध्ये चित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात यावे. तसेच, मुलांच्या स्वप्नातील भारत व विकसित भारत - २०४७ या दोन विषयांवर विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. चित्रकला स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेत विजयी विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात यावेत. त्यामध्ये, स्थानिक नागरिकांना सहभागी करुन घ्यावे. शाळा स्तरावर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योजनांची व विकसित भारताची माहिती समजावून सांगावी. तसेच, निवडलेल्या स्पर्धकांचे व्हिडीओ तयार करुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यांना सादर करावेत. सर्व शिक्षणाधिकाऱ्यांनी प्राप्त झालेल्या विजेत्यांचे व्हिडीओ व चित्रकला यांचे जिल्हास्तरीय प्रदर्शन आयोजित करावे. शालेय शिक्षण विभागाने सर्व जिल्ह्यांतील विजेत्यांचे व्हिडीओ व चित्रकला यांचे राज्यस्तरीय प्रदर्शन आयोजित करावे. यासाठी **गट शिक्षण अधिकारी** हे तालुका स्तरावरील नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील व यासंदर्भातील संकलीत अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) हे **शालेय शिक्षण विभागास** सादर करतील.

७. अंगणवाडी उत्सव :-

सर्व अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांना आमंत्रित करण्यात यावे. सदर कार्यक्रमात महिलांना आरोग्य व पोषण यासंदर्भातील योजनांची माहिती देण्यात यावी. लहान मुलांचे मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. अंगणवाडीतील मुलांना फळे व मिठाईचे वाटप करण्यात यावे. अंगणवाडी सेविका / मदतनीस / आशा कार्यकर्त्यांचा सदर कार्यक्रमात यथोचित सन्मान करण्यात यावा. या कार्यक्रमामध्ये लाभार्थी महिला पोषण व आरोग्य योजनांचा त्यांना झालेला लाभ विषद करतील. यासाठी **बाल विकास प्रकल्प अधिकारी** हे तालुका स्तरावरील नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील व यासंदर्भातील संकलीत अहवाल उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास) हे **महिला व बाल विकास विभागास** सादर करतील.

८. आशीर्वादाचा दिवा :

राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन आशीर्वादाचा दिप प्रज्वलित करणे हा महत्वाचा उद्देश आहे. याकरीता विविध योजनांचा लाभ दिलेल्या विभागांच्या अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांच्या घरी दिप प्रज्वलित करावा. त्यासाठी सर्व मंत्रालयीन विभागांनी राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांच्या याद्या मुख्य सचिव यांचे कार्यालयात दिनांक ११ सप्टेंबर, २०२६ पर्यंत उपलब्ध करुन द्याव्यात.

९. **बदलाची गोष्ट :-**

राज्य व केंद्र शासनाच्या योजनांमुळे लाभार्थ्यांच्या जीवनमानामध्ये झालेल्या सकारात्मक बदलाच्या यशोगाथा नागरिकांपर्यंत पोहचविणे. यासंदर्भात नागरिकांच्या बोलक्या प्रतिक्रिया नावासह व्हिडीओद्वारे रेकॉर्ड करुन संकलीत करण्यात याव्यात. यासाठी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभागाने असे व्हिडीओ / रिल्स संकलीत करण्यासाठी प्लॅटफॉर्म विकसित करावा. राज्यस्तरावर प्राप्त व्हिडीओ / रिल्स मधून उत्कृष्ट व्हिडीओ / रिल्स निवडण्यात याव्यात. तालुका स्तरावर व जिल्हा स्तरावर विविध योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या विभागांच्या अधिकाऱ्यांवर नागरिकांच्या उत्कृष्ट यशोगाथा संकलीत करुन राज्यस्तरावर सादर करण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे.

१०. **आभार आणि संकल्पाची रांगोळी :-**

दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ या एकाच दिवशी राज्यातील प्रमुख सार्वजनिक ठिकाणी जनकल्याणकारी योजना, राष्ट्रीय प्रतीके आणि विकसित भारताचे संकल्पना या विषयावर आधारीत मानवी रांगोळीचे आयोजन करण्यात यावे. सदर मानवी रांगोळीचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे. याशिवाय, नैसर्गिक सामुग्रीचा वापर करुन कला परंपरा, पर्यटन निसर्ग संस्कृती यावर आधारीत रांगोळी काढण्यात यावी. यासाठी **सांस्कृतिक कार्य विभाग** हा नोडल विभाग म्हणून काम पाहील.

११. **नमो सेवागाथा :-**

केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या जनकल्याणाच्या योजनांची माहिती देणारे कार्यक्रम कला पथक / नाट्य पथकाद्वारे शाळा, महाविद्यालये व ग्रामपंचायत स्तरावर आयोजित करण्यात यावेत. यासाठी कार्यक्रमाची आगाऊ माहिती नागरिकांना देण्यात यावी. सर्वोत्कृष्ट कलापथक / नाट्य पथकांना जिल्हा / राज्य स्तरावर प्रदर्शनाची संधी द्यावी. स्थानिक स्तरावरील उत्कृष्ट कलाकार, विद्यार्थी व शिक्षकांचा सन्मान करण्यात यावा. दि. २ ऑक्टोबर , २०२६ रोजी तालुका स्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. यासाठी **गट शिक्षण अधिकारी** हे तालुका स्तरावरील नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील व यासंदर्भातील संकलीत अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) हे **शालेय शिक्षण विभागास** सादर करतील.

१२.**जल, जन आणि सेवा संकल्प यात्रा :-**

जल, जन आणि सेवा संकल्प यात्रा राज्यातील **धुळे** जिल्ह्यामधून जाणार आहे. त्याठिकाणी संकल्प यात्रेचे स्वागत करुन जिल्ह्यातील स्थानिक योजना आणि विकास कामांबाबत संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. संकल्प यात्रेतील एलईडी स्क्रीनद्वारे माहिती चित्रफीत दाखविण्यात यावी.

१३.जनसेवक महाकुंभ :-

ग्रामपंचायत स्तरापासून ते संसदेच्या स्तरापर्यंत काम करणाऱ्या लोकप्रतिनिधींचा महाकुंभ दिनांक १७ ऑक्टोबर, २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये सरपंच ते संसद सदस्य या विविध स्तरावरील लोकप्रतिनिधीं विकसित भारताबाबत त्यांचे अनुभव कथन करतील. यामध्ये, मा. पंतप्रधान उपस्थित लोकप्रतिनिधींना संबोधित करतील. मा. पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखाली सर्व लोकप्रतिनिधी विकसित भारताचा संकल्प घेतील व त्यानंतर सेवा संकल्प अभियानाची सांगता करण्यात येईल. यासाठी **ग्राम विकास विभाग** हा नोडल विभाग म्हणून काम पाहील.

१४. अंमलबजावणी व संनियंत्रण समिती:-

सदर अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | संबंधित जिल्ह्यातील सर्व आयुक्त, महानगर पालिका | सदस्य |
| ३. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४. | जिल्हा माहिती व जनसंपर्क | सदस्य सचिव |

सदर अभियानाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय स्तरावर खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १. | विभागीय आयुक्त | अध्यक्ष |
| २. | संबंधित विभागातील सर्व जिल्हाधिकारी | सदस्य |
| ३. | संबंधित विभागातील सर्व आयुक्त, महानगर पालिका | सदस्य |
| ४. | संबंधित विभागातील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५. | उपसंचालक, माहिती व जनसंपर्क | सदस्य सचिव |

सदर अभियानाच्या संनियंत्रणासाठी राज्यस्तरावर खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १. | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव, वने | सदस्य |
| ३. | अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव, महसूल | सदस्य |
| ५. | अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण | सदस्य |
| ६. | अपर मुख्य सचिव, नगर विकास - २ | सदस्य |
| ७. | प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | |
| ८. | प्रधान सचिव, शालेय शिक्षण | सदस्य |
| ९. | प्रधान सचिव, उद्योग | सदस्य |
| १०. | सचिव, आदिवासी विकास | |
| ११. | सचिव, महिला व बाल विकास | सदस्य |
| १२. | सचिव, कृषि | सदस्य |
| १३. | सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता | सदस्य |
| १४. | सचिव, ग्राम विकास | सदस्य |
| १५. | सचिव, सांस्कृतिक कार्य | सदस्य |
| १६. | सचिव, इतर मागास बहुजन कल्याण | सदस्य |
| १७. | सचिव, दिव्यांग कल्याण | सदस्य |
| १८. | महासंचालक, माहिती व जनसंपर्क | सदस्य सचिव |

सेवा संकल्प अभियानांतर्गत उपरोक्त मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित विभागाने सविस्तर सूचना व अंमलबजावणी कार्यपध्दती स्वतंत्रपणे क्षेत्रीय अधिकाऱ्यांना त्यांच्या स्तरावरुन निर्गमित करावी. संबंधित विभागाने सेवा संकल्प अभियांनांतर्गत केलेल्या कामांचे व्हिडीओ चित्रीकरण, रिल्स व फोटो यांचे संकलन करुन माहिती व जनसंपर्क विभागास उपलब्ध करुन द्यावेत. माहिती व जनसंपर्क विभागाने उपलबध झालेले व्हिडीओ, रिल्स व फोटो यांची छाननी करुन उत्कृष्ट व्हिडीओ, रिल्स व फोटो यांना सुयोग्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०९०९१७४४१७३८०७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(राजेश अग्रवाल)
मुख्य सचिव

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव,
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण) यांचे अपर मुख्य सचिव,
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा, अल्पसंख्याक विकास) यांचे सचिव,
५. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
८. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१०.महासंचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ,
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.मुख्य आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई.
१३.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
१४.सर्व जिल्हाधिकारी
१५.सर्व महानगरपालिका आयुक्त,
१६.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१७.सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख,
१८. प्रादेशिक प्रमुख/कार्यालय प्रमुख,
१९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
२०.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२१.निवड नस्ती सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.